# प्रेसनोट

सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार भंडारा जिल्हयात दि.०१/१२/२०१८ रोजी पासुन हेल्मेट सक्ती लागु करण्यात आली असुन आतापर्यंत पोलीसांनी हेल्मेटचा वापर न करणा–या दुचाकी स्वारा विरूध्द १३८५ केसेस केलेल्या असुन एकुण रूपये ६९२५००/– दंड वसुल केलेला आहे.

प्रशासनाकडुन करण्यात आलेल्या हेल्मेट सक्तीच्या निर्णयाला सुरूवातीच्या काही दिवसामध्ये नागरिकांनीही चांगला प्रतिसाद दिलेला होता. जिल्हयात तसेच शहरामध्ये ७० ते ८० टक्के दुचाकीस्वार हेल्मेटचा वापर करतांना दिसुन येत होते. मात्र काही राजकीय पक्षांचे, सामाजीक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी हेल्मेट सक्तीच्या विरोधात प्रशासनाकडे निवेदन देवुन शहरामध्ये हेल्मेट सक्ती शिथील करण्याची मागणी केली. त्यामुळे तेव्हापासुन शहरामध्ये हेल्मेट सक्ती शिथील करण्यात आल्याचा गैरसमज निर्माण होवुन हेल्मेट वापराचे प्रमाण कमी झाल्याचे दिसत आहे व कारवाई करणा–या पोलीसांना नागरिकांकडुन विरोध होतांना दिसुन येत आहे.

त्यामुळे हल्मेट सक्तीची अंमलबजावणी करताना नागरिकांसी होणारा संघर्ष टाळण्याकरीता आता पोलीसांनी हेल्मेटचा वापर न करणा–या दुचाकीस्वारांचे दुचाकीचे रजिष्ट्रेशन क्रमांक नोद करून आरटीओ कडुन त्यांचा तपशिल प्राप्त करून अशा दुचाकीस्वारा विरूध्द कोर्टामध्ये परस्पर केसेस दाखल करण्यास सुरूवात केली आहे. त्याकरीता गेल्या एक आठवडयापासुन वाहतुक नियंत्रण शाखेच्या मोबाईल व्हॅन मधुन मेघा फोनद्वारे नागरिकांना याबाबत सतर्क करण्यात येत आहे व हेल्मेटचा वापर करण्याबाबत सुचना देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.२०/०८/२००३ रोजी अधिसुचना काढुन महानगर पालिका व नगर परिषद क्षेत्र यांना हेल्मेट सक्ती मधुन वगळले होते. मात्र त्यानंतर मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने शासन अधिसुचना क्रमांक–एमव्हीए ०५८८/सीआर ५७०/७६४–अ/परि.–२ अन्वये दि.१७/०१/२००५ रोजी पुन्हा अधिसुचना काढुन राज्याच्या सर्व क्षेत्रामध्ये हेल्मेट सक्ती लागु केली आहे. त्यानुसार हेल्मेट बाबतच्या नियमांची अमंलबजावणी राज्यात सुरू असुन कारवाईस विरोध दुचाकीस्वारांना यापुढे कोर्ट कारवाईस सामोर जावे लागणार आहे. तेव्हा गैरसोय टाळण्यासाठी हेल्मेटचा वापर करावा. असे आवाहन पोलीस विभागाकडुन करण्यात आलेले आहे.

**(बी.आर.गाडे)**
**पोलीस निरीक्षक**
**वाहतुक नियंत्रण शाखा,भंडारा**